

Our Studnt **Bhagwati Suryawanshi** from E & TC Dept. secured **First Rank in PG** Engineering SUK Exams

लोकमत



अशोकराव माने इन्स्टिट्यूटमध्ये भगवती सूर्यवंशी हिचा सत्कार डॉ. दीपक मुदगल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. संजय पाटील, प्रा. अमोल राजमाने, प्रा. प्रवीण घेवारी, प्रा. सुहास सपाटे, प्रा. युवराज गुरव उपस्थित होते.

# भगवती सूर्यवंशी हिचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** वाठार (ता. हातकणंगले) येथील अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमधील विद्यार्थिनी भगवती शिवाजी सूर्यवंशी हिने शिवाजी विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदव्युत्तर विभागामध्ये सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. याबद्दल महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी पुणेचे उदगाते कै. धोंडीमामा साठे पुरस्कार देऊन विद्यापीठाच्यावतीने तिचा सन्मान करण्यात येणार आहे.

माने इन्स्टिट्यूटने विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याचे आपले स्थान कायम ठेवले आहे, अशी माहिती कार्यकारी संचालक डॉ. दीपक मुदगल यांनी दिली. संस्थाध्यक्ष विजयसिंह माने यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला. भगवती सूर्यवंशी ही इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागात शिकते आहे. तिला डॉ संजय पाटील, विभागप्रमुख प्रा. प्रवीण घेवारी, प्रा. प्रवीण देसाई यांचे मार्गदर्शन लाभले

Hello Kolhapur
Page No. 9 Dec 22, 2017
Powered by: erelego.com